ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख ७ जुलै, १९५४ | अंक १६

## विविध माहिती

**पंजाब सरकारनें दिलेली कर्जें**—पंजाब इंडस्ट्रीज बोर्डानें उद्योगधंद्यांना १,९१,५०० रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. त्याशिवाय १४,२१० रुपये मदत म्हणून देण्यांत आले. कर्जासाठी २६ उद्योगधंद्यांचे आणि मदतीसाठी ९२ उद्योगधंद्यांचे अर्ज आले होते. एकूण ३१ उद्योगधंद्यांना ह्या ना त्या रीतीची मदत करण्यांत आली.

**संगमरवरी दगडांना मागणी**—बेल्जम हा देश दरवर्षी १७,००० टन वजनाचे संगमरवरी दगड परदेशांतून आयात करतो. सर्व दगड मुख्यतः फ्रान्स आणि इटलीमधून आयात करण्यांत येतात. भारत जर योग्य त्या दर्जाचा दगड वाजवी किंमतीला पुरवूं शकला, तर भारतीय संगमरवरी दगडालाहि बेल्जममध्यें वाव मिळूं शकेल.

**देवालयांतील जडजवाहिरांची किंमत**—द. भारतांत सुमारें ७,८०० मोठीं देवळें आहेत व त्या सर्व देवळांत मिळून ४४१ लाख रुपये किंमतीचीं जडजवाहिरें आहेत. त्यांपैकी एकतृतीआंश किंमतीचीं रत्नें तिरुपति, श्रीरंगम्, रामेश्वरम् आणि मदुरा ह्या देवळांच्या व्यवस्थापकांच्या ताब्यांत आहेत.

**बोलका शब्दकोश**—शिकॅगो येथील एका संशोधकानें टेबलावर मावण्यासारखा एक यांत्रिक शब्दकोश तयार केला आहे. शब्दकोशाचें हें यंत्र शब्दाची व्याख्या तर देतेंच, पण त्या शब्दाचा उच्चारहि करून दाखवितें. शब्द आणि त्याची व्याख्या मॅगनेटिक टेप असणाऱ्या एका कार्डावर छापलेली असतात. कार्ड यंत्रांत घातल्याबरोबर वापरणाऱ्याला शब्द दिसूं लागतो आणि मॅगनेटिक टेपमुळें त्याचा उच्चारहि केला जातो.

**कॉस्मिक किरणांचें संशोधन**—कॉस्मिक किरणांचें संशोधन करण्यासाठी निलगिरी पर्वतावर एक केंद्र उभारण्याचा विचार भारतीय सरकार करीत आहे, अशी माहिती भारतीय-अणुशक्ति कमिशनचे अध्यक्ष डॉ. एच्. जे भाबा ह्यांनीं सांगितली आहे.

**मध्य भारताचा विकास**—मध्य भारताच्या विकासाचें कार्य करण्यासाठी निर्माण करण्यांत आलेल्या बोर्डाची पुनर्घटना करण्यांत येणार आहे. नवीन बोर्डांत आठ सभासद असतील असें समजतें. मध्य भारताचा दुरुस्त केलेला पंचवार्षिक कार्यक्रम नवीन बोर्डापुढें मंजुरीसाठी ठेवण्यांत यावा, असें सुचविण्यांत येत आहे.

**भारतामधील मिठाचें उत्पादन**—भारतामधील मिठागरांतून सध्यां देशाला लागणाऱ्या मिठापेक्षा अधिक मिठाचें उत्पादन होत आहे, असें समजतें. मिठाची थोडीबहुत निर्यात जपानला नुकतीच करण्यांत आली. गेल्या वर्षी मिठाचें उत्पादन सुमारें ८,९५,००,००० मण झालें. चालू वर्षीहि तितकेंच उत्पादन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**हैदराबाद येथें कॅन्सरचें इस्पितळ**—पुढील वर्षाच्या जानेवारी महिनाअखेर हैदराबाद येथें एक कॅन्सरचें इस्पितळ उघडण्यांत येणार आहे. इस्पितळांत १०० रोग्यांची सोय करण्यांत येणार असून ह्या रोगासंबंधीं संशोधनहि करण्यांत येणार आहे. इस्पितळ आणि संशोधन-केंद्र ह्यांना मिळून ४,५०,००० रुपये खर्च येणार आहे. पैकी १,००,००० रुपये गोळा करण्यांत आले आहेत.

**मध्य भारतामधील मच्छीमारीचा धंदा**—मध्य भारत सरकारनें राज्यांतील मच्छीमारीच्या धंद्याचा विकास करण्याचें ठरविलें आहे. धंद्याच्या विकासाला मदत करण्यासाठी २ पंप, दोन मोटार-बोटी व शीत हवामान राखणारी एक मोटार इतकें साहित्य टेकनिकल को-ऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशन ह्या परदेशीय संस्थेकडून मिळणार आहे. जरूर त्या नोकरवर्गाची सोयहि सरकार करणार आहे.

**मुलांसाठी इस्पितळ**—१९५५ च्या मार्च महिन्यापूर्वी लखनौ येथें लहान मुलांसाठी एक इस्पितळ स्थापन करण्यांत येणार आहे. इस्पितळांत ५० रोगी मुलांची सोय करण्यांत येणार आहे. इमारत बांधण्यासाठी राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य खात्यानें लखनौ विद्यापीठाला २·५ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या बालविषयक शाखेतर्फें इस्पितळाचें साहित्य पुरविण्यांत येणार आहे.

**इटलीचें कृत्रिम रेशीम रशिआनें घेतलें**—इटलींत तयार होणारें कृत्रिम रेशीम मुख्यतः अमेरिकेला निर्यात होत असे. पण चालू सालच्या पहिल्या दोन महिन्यांत निर्यातींत बरीच घट झाली होती. रशिआनें बरेंच रेशीम घेतल्यामुळें घट भरून निघाली आहे. रेशमाशिवाय फळें, कापड, इत्यादि मालाहि रशिआनें व पूर्व युरोपमधील राष्ट्रांनीं मोठ्या प्रमाणावर आयात केला.

**भारत-स्वीडन व्यापार**—भारत आणि स्वीडन ह्या उभयता देशांनीं एकमेकांना लागणाऱ्या आयात मालाची यादी व्यापारी कराराला जोडली आहे. कापसाच्या सुताचें कापड, शाली, साड्या, तागाचा माल, काथ्याचा माल, रबरी वस्तू, खेळाचें सामान, मसाल्याचे पदार्थ, तेल व तेलबिया, ग्रामोद्योगाचा माल, इत्यादि वस्तू स्वीडन भारताकडून आयात करणार आहे.

**रशिआला बुद्धिबळाच्या डावाची देणगी**—रशिआंतील ट्रेड युनिअन काँग्रेसचे ११ वें अधिवेशन नुकतेंच झालें. त्याप्रसंगीं भारतीय ट्रेड युनिअन काँग्रेसच्या प्रतिनिधींनीं हस्तीदंताचा एक बुद्धिबळाचा डाव रशिअन प्रतिनिधींना देणगी म्हणून दिला. देणगी देण्याचा समारंभ अ. भा. ट्रेड युनिअन काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. एस. बॅनर्जी ह्यांच्या हस्तें झाला.

### अणुशक्ति व कोळशाची बचत

अमेरिकेंत उभारलें जाणारें, अणुशक्तीवर वीज निर्माण करणारें केंद्र ६०,००० किलोवॅट वीज उत्पन्न करील. एवढी वीज कोळशाचें जळण वापरून तयार करावयाची म्हटली, तर दरमहा ४,००,००,००० पौंड कोळसा लागेल.

### सूर्याचा मंद उजेड मोजणारें यंत्र

१५,००० मैल दूर असलेल्या एका मेणबत्तीचा उजेड मोजूं शकेल एवढें सूक्ष्म उजेड मोजणारें यंत्र अमेरिकेंत तयार करण्यांत आलें आहे.

### मि. ॲटली प्रभृति पुढाऱ्यांची चीनला भेट

ब्रिटिश मजूर पक्षाचे आठ सभासद येत्या ऑगस्टमध्यें चीनला भेट देणार आहेत, त्यांत मि. क्लेमंट ॲटली व मि. बेव्हन ह्यांचाहि समावेश आहे. मॉस्कोमार्गे पीकिंगला जाण्यासाठी ते ९ ऑगस्ट रोजीं विमानानें निघतील.

### ३½% नॅशनल प्लॅन लोन, १९६४

वरील कर्जाचे २४·९९ कोटी रुपयांचे कर्जरोखे जून, १९५४ मध्यें खपले. १९ एप्रिल, १९५४ पासून जून, १९५४ अखेर एकूण १०५·५५ कोटी रु. कर्ज जमा झालें आहे.


# राष्ट्राला हांक

तीन वर्षांपूर्वी, १९५१ च्या मार्चमध्यें भारतांतील जनतेनें आपलें जीवन सुधारण्यास आरंभ केला. आपल्या पंचवार्षिक योजनेचे हेतु अधिक अन्नधान्य पिकविणें, मालाचें उत्पादन वाढविणें, समाज सेवेच्या साधनांत वाढ करणें आणि अधिक रोजगारी निर्माण करणें हे होते.

आतांपर्यंतची प्रगति समाधानकारक आहे. नवभारत उभारण्याच्या या महान कार्यासाठीं आतांपर्यंत आपण जवळ जवळ एक हजार कोटी रुपयांपर्यंत खर्च केलाच आहे. अन्नधान्यासाठीं आतां आपण परदेशांवर अवलंबून नाहीं. टिलैय्यासारखे प्रचंड पाट-बंधारे आपण बांधले, बोकाऱ्यासारखीं थरमल वीज शक्ति केंद्रें उभारलीं, सिंद्रीसारखे कारखाने काढले आणि चंदीगढसारखीं शहरें वसविलीं. आतां आपण आपली रेल्वे एंजिनें स्वतःच तयार करतों आणि सुटे भाग जोडून विमानें आणि मोटारी बनवितों. समाज विकास योजना आणि ग्राम विस्तार योजना यांच्या द्वारें आपण ग्रामीण वैभवाचा पाया घातला आहे.

**प्रयत्नांची पराकाष्ठा आवश्यक :** इतकी प्रगति आपण केली तरी उरलेल्या दोन वर्षांत आपण आपल्यापुढें ठेविलेलें लक्ष्य गांठण्यासाठीं सर्व बाजूंनीं प्रयत्नांची पराकाष्ठा करणें आवश्यक आहे. या सर्व प्रयत्नांचा खर्च पुरा करण्यासाठीं भारताला अजून सुमारें तेराशें कोटी रुपयांची गरज आहे.

या प्रसंगाला धैर्यानें तोंड देण्यासाठीं नॅशनल प्लॅन लोन ही राष्ट्राला हांक आहे. पंचवार्षिक योजना ही जनतेची योजना आहे. ती यशस्वी करण्यासाठीं प्रत्येकानें आपापल्या शक्तिनुसार तिला हातभार लावणें हें जनतेचें कर्तव्य आहे. तें तुमचें आणि माझें कर्तव्य आहे.

## नॅशनल प्लॅन लोन

*सढळ हातानें भरणा करा*

(३½% व्याज दरसाल दर सहा महिन्यांनीं मिळतें)

अधिक माहितीसाठीं दी रिझर्व बँक ऑफ इंडिया, इंपीरियल बँक ऑफ इंडिया, दी हैद्राबाद स्टेट बँक, दी बँक ऑफ म्हैसूर लि. यांच्या शाखा किंवा कोणतीहि सरकारी ट्रेझरी किंवा सब-ट्रेझरी यांच्याकडे लिहा.

## नॅशनल प्लॅन सर्टिफिकिटें

*विकत घ्या*

(४½% व्याज दरसाल पूर्ण मुदत भरल्यावर)

सेव्हिंग बँकेचें कामकाज करणाऱ्या पोस्ट ऑफिसांत अधिक सविस्तर माहिती मिळेल.

### विकास योजनेची प्रगति

| | | लक्ष्यें योजना काल १९५१–५६ | साध्य झालेलीं १९५३–५४ पर्यंत |
|---|---|---|---|
| अन्नधान्यें | | ७६·० लाख टन | ६०-७० लाख टन (दरसाल अधिक उत्पादन) |
| पाणी पुरवठा (मोठ्या धरण योजना) | | ८,५३३,००० एकर | ३,५५६,००० एकर |
| वीजशक्ति | | १०,८७,००० किलोवॅट | ७,२४,००० किलोवॅट |
| नवीन रस्ते | | ८७० मैल | ४४७ मैल |
| कापड | | ९८२ दशलक्ष याडे (दरसाल अधिक उत्पादन) | १,१६३ दशलक्ष याडे (दरसाल अधिक उत्पादन) |
| समाज विकास व ग्राम विस्तार योजना | | १,२०,००० खेडीं | ४८,७५० खेडीं |
| नवीन शाळा | | ४९,६९५ | २९,७२३ |
| नवीन हास्पिटलें | | ९९६ | ६०९ |

AC 566 A—MARATHI

**भारताच्या भविष्यकालीन विकासासाठीं रक्कम गुंतवा**

# अर्थ

बुधवार, ता. ७ जुलै, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी चळवळीबाबत अपेक्षा आणि प्रत्यक्ष उठाव

### प्रा. कर्वे ह्यांचा समयोचित इषारा

समाजविकास योजना कामकाजाचें मूल्यमापन करणारी एक स्वतंत्र संघटना नियोजन मंडळानें तयार केली व तिचे प्रमुख-स्थानीं प्रा. द. गो. कर्वे ह्यांची योजना केली. "राष्ट्रीय प्रश्नांच्या अभ्यासकांतील विशेष विचारवंतांपैकीं एक" असें ज्यांचें वर्णन श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं नुकतेंच केलें, त्या प्रा. कर्वे ह्यांच्या मूल्यमापनाच्या प्रस्तुत अहवालास सहकारी कार्यकर्त्यांच्या दृष्टीनें विशेष महत्त्व आहे. प्रा. कर्वे ह्यांनीं मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीच्या नेतृत्वाचे कामीं इन्स्टिट्यूटचे द्वारा महत्त्वाचा हात-भार लावलेला आहे आणि ह्या चळवळीचे ते एक विवेकी पुरस्कर्ते आहेत. समाजविकास योजनांच्या पहिल्या वर्षातील कामकाजाचें मूल्यमापन करतांना त्यांनीं सहकारी चळवळीचें त्या योजनांतील स्थान लक्षांत घेऊन प्रकट केलेले विचार सहकारी कार्यकर्त्यांनीं नीट ध्यानांत आणणें जरूरीचें झालें आहे. त्यांच्या मूल्यमापनांतील सहकारी चळवळीविषयक आढावा मूलग्राही महत्त्वाचा आहे; कारण ज्या पायावर समाजविकास योजनांचा प्रासाद रचावयाचा तो पाया भक्कम कसा होईल हें वेळींच लक्षांत घेऊन सावधगिरीनें व वास्तववादी भूमिकेवरून धोरणें आखलीं पाहिजेत. प्रत्यक्ष परिस्थिति व उद्दिष्टें ह्यांतील तफावत भरून काढण्याइतपत परिस्थिति नसेल, तर ती कशी निर्माण करतां येईल हें तपासून पाहिलें पाहिजे व सर्वच गोष्टी आवाक्यांत आणून बसविल्या पाहिजेत. ह्या संबंधांतील, सहकारी चळवळीवर सरकारी प्रवक्त्यांनीं व निवेदनांनीं टाकलेली जबाबदारी लक्षांत घेऊन, प्रा. कर्वे ह्यांनीं सहकारी चळवळीच्या मर्यादा वेळींच स्पष्ट करून सांगितल्या, ही त्यांची कामगिरी अत्यंत मोलाची अशी झालेली आहे. त्यांच्या आढाव्याचा परिचय आम्हीं म्हणूनच विस्तारानें देत आहों:—

समाजविकास योजना आणि सहकारी संघटना ह्यांचें परस्परावलंबन किती जिव्हाळ्याचें आहे हें योजना आखण्याचे प्रारंभीच्या काळांत अगदीं स्पष्टपणें नमूद करण्यांत आलें नव्हतें. परंतु सहकारी संस्थांच्या स्थापनेवर अधिकाधिक भर देण्यांत येऊं लागला. सहकारी सेवाक्षेत्रांत खेड्यामधील सर्व कुटुंबें कांहीं थोड्याशा कालावधींतच यावींत ह्या दृष्टीनें योजना तयार करण्याची निकड विकास योजना अधिकाऱ्यांना लावण्यांत येऊं लागली. साधारणपणें ज्या क्षेत्रांत सहकारी संघटनेची प्रगति झालेली होती अशा ठिकाणीं त्यांची संख्या व त्यांचीं कार्यें ह्यांत, विकास योजनांस गति मिळत गेली त्याप्रमाणें, वाढ होऊं शकली. आंध्र, बिहार, मुंबई, पंजाब, सौराष्ट्र, ह्या राज्यांत निश्चितपणें प्रगति आढळून आली. कांहीं राज्यांतून सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रेरणेनें सहकारी संस्था नोंदण्यांत आल्या असून त्यांचेकडे बी, खतें, अवजारें, इत्यादींच्या वाटपासारखीं महत्त्वाचीं कामें सोंपविण्यांत आलेलीं आहेत. त्यापैकीं बहुतेक नांवालाच "सहकारी" आहेत; त्यांची व्यवस्था बहुंशीं सरकारी आहे आणि फायदा मिळविण्यापलीकडे सभासद अधिक लक्ष घालीत नाहींत. अशा केवळ नामधारी सहकारी संस्थांसंबंधीं पूर्वींच्या अनुभवावरून शहाणपण शिकलें पाहिजे. विकास योजनांच्या कार्यक्रमाच्या जाहीर हेतूप्रमाणें, भक्कम प्रकारची सहकारी संघटना उभारण्यांत आली पाहिजे. त्यासाठीं प्राथमिक शैक्षणिक प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत व स्थानिक कार्यकर्ते गोळा केले पाहिजेत. सहकारी संस्थांचा प्रसार करण्याकडे दुर्लक्ष करणें जसें टाळलें पाहिजे, त्याचप्रमाणें पुरेसें शिक्षण व मार्गदर्शन नसलेल्या ठिकाणीं सोसायट्या स्थापन करणेंहि टाळलें पाहिजे.

सहकारी संस्था अयशस्वी झाल्या आहेत, त्यांचा पुनरुद्धार करण्याचा विचार करणें तूर्त तरी सोडून दिला पाहिजे आणि आपण खात्याकरवीं किंवा त्यासाठींच स्थापन केलेल्या संघटनांमार्फतच कामाचा उठाव केला पाहिजे, अशी विकास अधिकाऱ्यांची दृढ भावना झालेली आहे. अजाण किंवा गरीब जनतेवर सहकारी संस्था लादण्याचा अनुभव स्वाभाविकच निराशाजनक आहे, हें कबूल केलेंच पाहिजे. ह्याचा अर्थ असा, कीं सहकारी पद्धतीनें विकासाचा कार्यक्रम आंखताना सावधगिरी व तारतम्य बाळगलें पाहिजे. सर्व विभागांना ह्यासाठीं तीन वर्षांचा अवधि पुरा पडण्याजोगा नाहीं. परंतु, स्थानिक परिस्थिति लक्षांत घेऊन आशादायक ठिकाणीं योग्य अशा सहकारी संस्था स्थापण्याचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. शिक्षण, साहाय्य आणि मार्गदर्शन उचित प्रकारें सोसायट्यांना उपलब्ध करून द्यावें. इतर विभागांत सहकारी संस्थांची वाढ कोणत्या मार्गानें व गतीनें व्हावी, हें ठरवितांना उपरिनिर्दिष्ट सोसायट्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यांत यावा. राज्यांतील इतर ठिकाणच्या आणि अपवादात्मक प्रसंगीं देशांतील इतर ठिकाणच्या सहकारी कार्यकर्त्यांचें साहाय्य घेणेंहि उपकारक ठरेल.

सहकारी चळवळ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोचली पाहिजे, हें उद्दिष्ट असलें, तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिति अशी आहे कीं सहकारी दृष्ट्या जरा पुढारलेल्या राज्यांतूनहि सहकारी चळवळीशीं संबंध आलेलीं कुटुंबें, शेतकऱ्यांचीं कुटुंबेंहि, उद्दिष्टाचे मानानें फारच कमी आहेत. शेतकऱ्यांचे मध्यें बिगर–पतवान शेतकऱ्यांचा फार मोठा भरणा आहे, ही उद्दिष्ट पोचण्याच्या मार्गांतील एक अडचण असल्याचें सांगण्यांत येतें. योजनाबद्ध व सुसंघटित राष्ट्रीय पत–पद्धतींत अंतर्भूत असलेल्या गोष्टींचें अपुरें आकलन, हें ह्या विचारसरणीच्या बुडाशीं कारण आहे. जेव्हां प्रत्यक्ष देऊं केलेल्या स्थावर तारणावरूनच माणसाची पत ठरविण्यांत येत होती, त्यावेळीं फक्त सुस्थितींतील जमीनमालकांस पतवान समजले जाणें स्वाभाविक होतें. ह्या पद्धतींत, सहकारी पतसंस्थांना ठेवीदार व इतर बँका ह्यांचेकडून भांडवलपुरवठा होत असे; बँका पतपेढ्यांची पत स्थावर तारणावरूनच ठरवीत असत. लहान जमीनमालक, खंडकरी व स्वतःची जमीन नसणारे मजूर ह्यांना पतवान समजलें जात नसे.

आतां राष्ट्रीय संघटनेमार्फत, मान्यता दिलेल्या कामासाठीं पुरेसें भांडवल पुरविण्याच्या योजनेंत कर्ज देण्यास लायक

समानत्वाचा विचार करावयाचा नसून, कर्जाचा विनियोग कसा केला जाणार आहे ह्यावर पत मोजली जावयाची आहे. ज्यासाठी कर्ज द्यावयाचें ती बाब उत्पादक स्वरूपाची असली आणि म्हणूनच त्या उत्पादनांतूनच कर्ज भागविणारी असली म्हणजे योग्य ती दक्षता घेऊन दिलेलें कर्ज असुरक्षित मानण्याचें कारण नाहीं, असें नवें धोरण आहे. कर्जपुरवठ्याप्रमाणें इतरहि कित्येक उपकारक गोष्टी सहकारी संस्थांना करतां येण्याजोग्या आहेत. योजनाबद्ध विकासाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांतील सामाजिक दृष्टिकोन लक्षांत घेऊन, सहकारी चळवळीकडे नव्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. ह्यासंबंधांत खासगी प्रयत्नांशीं सहकारी संस्थांची तुलना न करतां, ती सरकारी खात्यांशीं केली पाहिजे. सरकारी निवेदनांतून विकासयोजनांमध्यें सहकारास दिलेलें मूलग्राही महत्त्व लक्षांत घेता आणि त्याचबरोबर त्यामानानें प्रत्यक्ष साधलेली अल्प कामगिरी विचारांत घेतां ह्या सबंध विषयाचाच नव्यानें व सर्वांगीण विचार करण्याची पाळी आली आहे.

---

**पाकिस्तानची कापडाची आयात**— पाकिस्तानमधील व्यापाऱ्यांनीं परदेशाहून मोठ्या प्रमाणावर कापड आयात करण्यास प्रारंभ केला आहे. गेल्या कांहीं दिवसांत कराचींतील खाजगी व्यापाऱ्यांनीं दररोज १,००,००० वार कापसाचें कापड आयात केलें आहे. अगदीं परवांपर्यंत ही आयात दर महिना १,००,००० वार इतकी कमी होती. खाजगी व्यापाऱ्यांना आयातीचे परवाने देण्यांत आले आहेत.

**आसामला कॅनडाची मदत**—भारताच्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें आसाम राज्यांत एक वीज-निर्मितीसाठीं धरण बांधण्यांत यावयाचें आहे. ह्या राज्यांत अशा प्रकारचें हें पहिलेंच धरण होईल. धरणासाठीं लागणारी सर्व यंत्रसामुग्री कोलंबो योजनेप्रमाणें कॅनडानें देऊं केली आहे. सर्व साहित्याला मिळून ८० लाख रुपये पडतील असें समजतें. कॅनेडिअन एंजिनिअर्सनीं पहाणी केल्यावरच मदत निश्चित करण्यांत आली.

**थंड हवेच्या ठिकाणीं 'रोपवेज'**—मुंबई राज्यांतील कांहीं थंड हवेच्या ठिकाणीं वर जाण्यासाठीं 'रोपवेज' बांधण्याची परवानगी मुंबई सरकार विधिमंडळाकडे मागणार आहे, असें समजतें. पनवेल ते माथेरान ह्यांना जोडणारा अशा प्रकारचा मार्ग बांधण्याची एक योजना एका खाजगी कंपनीनें सरकारकडे धाडली आहे. अशी सोय करण्यासाठीं कंपनीला सुरुवातीलाच १० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

**कोलंबो योजनेप्रमाणें मिळणारी मदत**— येत्या कांहीं महिन्यांत कोलंबो योजनेप्रमाणें ब्रिटनकडून २,००,००० पौंड किंमतीचें साहित्य तदंतर्गत देशांना पुरविलें जाणार आहे. ह्या साहित्यांत पुस्तकापासून एंजिनिअरिंगच्या हत्यारापर्यंत सर्व प्रकारची सामुग्री आहे. पुणें येथील नॅशनल केमिकल लॅबोरेटरीसाठीं १९,००० पौंडांचीं साधनें मिळणार असून दिल्ली येथील आयर्विन इस्पितळाला १०,००० पौंडांची सामुग्री मिळणार आहे.

**उत्तरप्रदेशांत कॅन्सरचें इस्पितळ**—उत्तर प्रदेशांतील कॅन्सरचें पहिलें इस्पितळ नैनीताल येथें स्थापन करण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे. इस्पितळासाठीं जवळ जवळ ५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. राज्य-सरकार चालवीत असलेल्या रॅम्झे इस्पितळाचेंच रूपांतर नवीन इस्पितळांत करण्यांत येणार आहे. नवीन संस्था २ ऑक्टोबरपासून सुरू होण्याची शक्यता आहे

## झेकोस्लोव्हाकिआकडून मिळणारा औद्योगिक माल

झेकोस्लोव्हाकिआच्या व्यापारी प्रतिनिधींचें एक मंडळ सध्या भारताचा दौरा करीत आहे. प्रतिनिधी-मंडळाचे नेते मि. फ्रॅन्सिस अर्डमेक ह्यांनीं भारत आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान होऊं शकणाऱ्या देवाणघेवाणीसंबंधीं पुढीलप्रमाणें विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, भारताचे उद्योगधंदे उभे करण्याची झेकोस्लोव्हाकिआची इच्छा आहे. भारतीय कारखानदारांना कोणत्या प्रकारची यंत्रसामुग्री पाहिजे आहे तें समजून घेण्यासाठी आम्ही आलों आहोंत. मात्र झेकोस्लोव्हाकिआ भारतांत भांडवल गुंतवूं शकणार नाहीं. झेकोस्लोव्हाकिआकडून भारताला सिमेंट व साखर ह्यांची यंत्रसामुग्री मिळूं शकेल त्याशिवाय विजेचे कारखाने, खाणींत लागणारीं यंत्रें, शेतीविषयक अवजारें, इत्यादि औद्योगिक मालहि मिळू शकेल. आमच्या देशानें तयार केलेली साखरेच्या कारखान्याची यंत्रसामुग्री भारतांत आज सहा ठिकाणीं काम करीत आहे. भारताला लागणारा औद्योगिक माल पुरविण्यासाठी आमचा देश येथील बाजारपेठेंत स्पर्धा करूं लागला आहे. ३५,००० टन वजनाचे रेल्वेचे रूळ पुरविण्याबाबतचें एक टेंडर आम्ही भारतीय सरकारकडे पाठविलें आहे. ह्या रेल्वेच्या रुळांची किंमत सुमारें १० लाख पौंड होईल. पाटण्याजवळ गंगेवर एक पूल बांधण्यांत येणार आहे. ह्या पुलासाठीं लागणारें पोलादी सामान पुरविण्यासाठींहि भारतीय सरकारकडे टेंडर पाठविण्यांत आलें आहे. भारत आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान नुकताच जो व्यापारी करार झाला आहे त्यामुळें उभयतां राष्ट्रांमधील व्यापाराची वृद्धि होण्यास चांगली मदत होईल. तथापि भारताला पतीवर माल देण्याबद्दल मात्र अधिक चर्चा करावी लागेल.

---

## रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाची बंगलोर येथें सभा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सभा २८ जून रोजीं बंगलोर येथें बँक ऑफ म्हैसूरच्या बोर्डरूममध्यें भरली होती. सेंट्रल बोर्डाची सभा बंगलोर येथें ह्यापूर्वीं कधींच भरली नव्हती. संध्याकाळीं म्हैसूरचे पंतप्रधान, श्री. हणमंतय्या, ह्यांनीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर व डायरेक्टर्स ह्यांना रेसिडेन्सीच्या हिरवळीवर चहापानास बोलाविलें. त्यावेळीं म्हैसूरचे राजप्रमुख, सर एम विश्वेश्वरअय्या, सर मिर्झा इस्माइल, इत्यादि पाहुणे उपस्थित होते. चहापानानंतर करमणुकीसाठीं सनातन कलाक्षेत्रमच्या शिष्यगणांचा भारत नाट्यमचा कार्यक्रम झाला.

---

## रिझर्व्ह बँकेच्या शाखांसाठीं इमारती

बँक ऑफ म्हैसूरच्या चेअरमननींहि चहापानाचा समारंभ घडवून आणून रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. बी. रामराव ह्यांचा सत्कार केला. त्यावेळच्या भाषणांत त्यांनीं सुचविलें कीं, रिझर्व्ह बँकेनें बंगलोर येथें स्वतःची इमारत बांधावी; बँकेची वर्षांतून एक तरी सभा बंगलोर येथें भरवावी. म्हैसूर राज्यांत बँक ऑफ म्हैसूर ही रिझर्व्ह बँकेची एजंट म्हणून काम करते. उत्तरादाखल भाषण करतांना श्री. रामराव म्हणाले, कीं कोणत्या राज्याचा काय विस्तार रहाणार आहे हें ठरल्याखेरीज इमारतींचा कार्यक्रम हातीं घेतां येणार नाहीं. रिझर्व्ह बँकेची जेथें जेथें शाखा आहे, तेथें तेथें इमारत बांधली जावी असा आग्रह होणारच. मद्रासला रिझर्व्ह बँकेनें मोठी थोरली इमारत बांधली, पण त्या राज्याचा मोठा भाग वेगळा झाला !

## मध्य-भारतांत कॉस्टिक सोड्याचा कारखाना

मध्य-भारत सरकारनें इंदूर येथें कॉस्टिक सोडयाचा कारखाना उभारण्याची योजना आखली होती. कारखाना उभा करण्यासाठीं ६० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला होता. भारतीय सरकारनें आतां ह्या कारखान्याच्या उभारणीस मंजुरी दिली आहे असें समजतें. एकूण ६० लाख रुपये भांडवलापैकीं ३० लाख रुपये कारखान्याची यंत्रसामुग्री आणि इतर साहित्य ह्यांच्या खरेदीवर खर्च करण्यांत येणार आहेत. बाकीची रक्कम कारखान्याच्या इमारतीसाठीं आणि खेळतें भांडवल म्हणून वापरण्यांत येणार आहे. सध्यांच्या योजनेप्रमाणें कारखान्यांत बसविण्यांत येणाऱ्या यंत्रसामुग्रीचा उपयोग करून दररोज सुमारें ११·२५ टन कॉस्टिक सोडयाचें उत्पन्न करतां येईल. हा सोडा 'रेयॉन' प्रतीचा तयार होईल आणि तो ९९ टक्के शुद्ध स्वरूपांत असेल. १९५३ सालीं भारतांत कॉस्टिक सोडयाचें उत्पन्न अवघें २२,५३६ टन झालें. त्यांतहि रेयॉन' प्रतीच्या कॉस्टिक सोडयाचें उत्पादन मर्यादितच आहे. अशा प्रकारचा सोडा भारतांत त्रावणकोर फर्टिलायझर्स अँड केमिकल्स ही एकच कंपनी सध्यां निर्माण करूं शकते. इंदूर येथें निघणाऱ्या कारखान्याला एका बाबतींत फारच अनुकूल परिस्थिति आहे. इंदूरपासून ७० मैलांवर नागदा येथें स्टेपल फायबर फॅक्टरी आहे. ह्या कारखान्याला लागणारा सोडा इंदूरच्या कारखान्यांतून जवळच्या जवळ मिळूं शकेल. इंदूर येथील संकल्पित कारखान्यांत दररोज १० टन क्लोरिनचेंहि उत्पादन करण्यांत येणार आहे असें समजतें. त्यापैकीं ५ टन क्लोरीनचें द्रवस्वरूपांत अवस्थांतर करण्यांत येणार असून उरलेल्या ५ टनांचा उपयोग हैड्रोक्लोरिक ॲसिड आणि ब्लीचिंग पावडर ह्यांच्या उत्पादनाकडे केला जाणार आहे, असें समजतें.

## नारळाची लागवड वाढविण्याचे प्रयत्न

भारतांत नारळाची लागवड वाढविण्यासाठीं इंडिअन कोकोनट रिसर्च कमिटी ही संघटना प्रयत्न करीत असते. ह्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून कमिटीतर्फे दरवर्षी ५,००,००० नारळाचीं रोपें वाटण्यांत येत असतात. लागवड करणाऱ्या शेतकऱ्याला तीं विकत घेणें सोपें जावें म्हणून प्रत्येक रोपासाठीं फक्त आठ आणेच किंमत घेण्यांत येते. रोपें तयार करण्यासाठीं कमिटीनें २९ नर्सरीज स्थापन केलेल्या आहेत. 'कसरन गोड' ह्या ठिकाणीं कमिटीनें एक संशोधन-केंद्रहि स्थापन केलें आहे. ह्या ठिकाणीं असलेल्या नर्सरीमधून दरवर्षी १०,००० नवीं रोपें तयार केलीं जातात. नारळांची लागवड वाढविण्याबरोबरच कमिटीतर्फे इतरहि कांहीं कामें करण्यांत येत असतात. खोबऱ्यासाठीं देशांत आणि देशाबाहेर बाजारपेठ मिळविण्याच्या कामीं कमिटीनें चांगली कामगिरी बजावली आहे. खोबऱ्याच्या तेलाची प्रतवारी लावण्याचें कामहि कमिटीनें केलें आहे. कोचीनहून मुंबईला खोबऱ्याची निर्यात करण्यांत येते. खोबऱ्याच्या वहातुकीचे दर कमिटीच्या खटपटीमुळें नुकतेंच कमी करण्यांत आले आहेत. कमिटीचें कार्य नीट चालू रहावें म्हणून पैशाची जरूरी अर्थातच भासते. तेल गाळणाऱ्या कारखान्यांतून जें खोबरें वापरलें जातें त्याच्या प्रत्येक हंड्रेडवेट वजनावर ४ आणे वसूल केले जातात. ह्या पैशांतूनच कमिटीचा खर्च भागविण्यांत येतो. कमिटींत एकूण २५ सभासद आहेत. त्यांपैकीं ९ सभासद नारळाची लागवड करणाऱ्या बागाइतदारांचे प्रतिनिधी आहेत, ६ सभासद खोबऱ्याच्या तेलाच्या कारखानदारांचे प्रतिनिधी आहेत आणि ७ सभासद त्रावणकोर-कोचीन राज्याचे प्रतिनिधी म्हणून काम पहातात आणि ३ सभासद भारतीय लोकसभेचे प्रतिनिधी आहेत.

## कामगारांची राहण्याची सोय करण्याची नव्या कारखानदारांवर सक्ति

यापुढें मुंबई शहर आणि मुंबई बेटांतील कोणत्याहि औद्योगिक कंपनीला स्वतःचा चालू कारखाना वाढविण्यासाठीं अथवा नवा कारखाना सुरू करण्यासाठीं बांधकाम करावयाचें असेल तर, सदरहू कंपनीनें नव्या कारखान्यांत नेमावयाच्या कामगारांपैकीं ४० टक्के कामगारांच्या राहण्याची सोय केली पाहिजे किंवा कारखान्याची वाढ केल्यामुळें जे जादा कामगार नेमावे लागतील, त्यांतील ४० टक्के कामगारांची राहण्याची सोय केली पाहिजे. तसें केल्याखेरीज त्यांना बांधकामाचा परवाना देण्यांत येणार नाहीं. आतांपर्यंत ज्या कंपन्या २० पेक्षा अधिक जादा कामगार नेमतील त्यांनाच कामगारांची राहण्याची सोय करण्याबाबतचीं हीं अट लागू होती. नव्या कारखान्यांसाठीं अथवा जुन्या कारखान्यांची वाढ करण्यासाठीं बांधकाम करतांना, सदरहू बांधकामामुळें किती जादा कामगार नेमावे लागतील याचा वाजवी अंदाज करून त्याप्रमाणें उपरोक्त अट पुरी करण्याच्या दृष्टीनें कामगारांची राहण्याची सोय करण्यासाठीं पुरेशी जागा राखून ठेवावी लागेल.

## भारतांतील विजेचा वापर

| कारण | % |
|---|---|
| घरगुती | ८·६ |
| व्यापारी | ५·० |
| औद्योगिक | ५२·१ |
| रस्त्यांवर उजेड | १·१ |
| ट्राम्वे | १·१ |
| विजेच्या आगगाडया | ४·९ |
| शेती व पाणीपुरवठा | २·६ |
| सार्वजनिक पाणीपुरवठा | ३·८ |
| लष्करी उपयोग | १·० |
| जनरेटिंग स्टेशन्स | ३·१ |
| इतर उपयोग व भारताबाहेर पुरवठा | १६·७ |
| एकूण | १००·० |

## ब्रॅडमन शेअरब्रोकरचा धंदा बंद करणार

सुप्रसिद्ध क्रिकेटपटु सर डोनाल्ड ब्रॅडमन ह्यांनीं आपली स्टॉकब्रोकरची फर्म २ जुलैपासून बंद केली आहे. डॉक्टरांच्या विश्रांतीच्या सल्ल्यावरून त्यांना ब्रोकरचें काम बंद करावें लागलें आहे. त्यांच्यावर गेलीं ३० वर्षे आलेल्या आपत्तींनीं त्यांना आजारी केलें आहे. त्यांचें वय ४६ वर्षांचें आहे.

**भारतांत जीप गाड्या तयार होणार**—भारतामधील महींद्र ॲण्ड महींद्र लि. ह्या कंपनीनें विलिस ओव्हरलंड ह्या परदेशीय कंपनीच्या साह्यानें जीप गाड्या तयार करण्याची एक योजना आखली असून तिला भारतीय सरकारनें मान्यताहि दिली असल्याचें समजतें. भारतांत तयार होणाऱ्या ह्या गाड्यांतील ६९ टक्के भाग वरील कंपनी तयार करणार आहे. अशा प्रकारच्या गाड्यांच्या आयातीवर बंदी घातली जाण्याचा संभव आहे.

## अमेरिकन अर्थकारणांत सहकारी संस्थांचें स्थान

### ( १ )

( लेखक : चार्लस फ्रँकलिन )

एप्रिल महिन्यांत भारतांतील सहकारी चळवळीचा सुवर्ण महोत्सव साजरा झाला. स्वतंत्र जगांतील इतर देशांतहि सहकारी चळवळीची अशीच वाढ होत गेली आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेंत सहकारी चळवळीचें वर्णन "१९ व्या शतकांतील मोठ्यांत मोठा आर्थिक शोध" या शब्दांत केलें जातें.

अमेरिकेंतील सहकारी चळवळीचा संबंध सुमारें १ कोटि कुटुंबांशीं येतो. तीं मंडळें खरेदीचा किंवा विक्रीचा व्यवहार करणाऱ्या कोणत्यातरी सहकारी मंडळाची सभासद असतात.

सभासदांना नेहमींच्या उपयोगाच्या वस्तू पुरविणारी सहकारी मंडळें ( कन्झुमर को ऑपरेटिव्ह स्टोअर ) ब्रिटन व स्कँडिनेव्हिया येथें फार महत्त्वास चढलीं आहेत; पण तशीं मंडळें अमेरिकेंत तुलनेनें फार थोडीं आहेत. सहकारी पद्धतीनें बांधलेलीं घरें न्यूयॉर्क शहरांत व इतर कांहीं मोठ्या शहरांत दिसतात, पण स्टॉकहोममधील सुंदर सहकारी गृहरचनेशीं त्यांची तुलना होऊं शकत नाहीं. तथापि अमेरिकन लोकांनीं जितक्या विविध प्रकारचे सहकारी व्यवहार चालविले आहेत तितके इतर कोणत्याहि देशांत चाललेले बहुधा दिसणार नाहींत.

### सहकारी संस्थांची विविधता

अमेरिकन लोकांच्या जीवनांत जितकी विविधता आहे तितकी त्यांच्या सहकारी संघटनांतहि आहे. "असोसिएटेड प्रेस ऑफ अमेरिका" आणि "रेल्वे एक्स्प्रेस एजन्सी" या अनुक्रमें वृत्तपत्रांच्या व रेल्वे कंपन्यांच्या प्रचंड सहकारी संघटना आहेत. याउलट, अगदीं लहान सहकारी मंडळेंहि अमेरिकेंत आहेत. उदाहरणार्थ, दफनविधीचीं सहकारी मंडळें. एखाद्या आडगांवांतील मूठभर शेतकरी कुटुंबें अशा लहान मंडळांत सामील असतात.

मनुष्यप्राण्याचीं अशी कोणतीहि आर्थिक किंवा सामाजिक गरज नसेल, कीं जी भागविण्यासाठी अमेरिकेंत कोठेंतरी एखादें सहकारी मंडळ निघालेलें नाहीं.

सहकारी मंडळांची सुरुवात अगदीं प्रथम अमेरिकेंत विम्याच्या क्षेत्रांत झाली. आगीपासून संरक्षण मिळविण्यासाठी कांहीं कुटुंबांनीं १७५२ सालीं फिलॅडेल्फियांत सहकारी मंडळ स्थापन केलें. शेतकरी लोकांनीं सहकारी विमायोजनेस सुरुवात केली आणि त्या उपक्रमांतूनच इतर क्षेत्रांतील आधुनिक ग्रामीण सहकारी योजना वाढीस लागल्या.

उत्पादक, गिऱ्हाइक व भाडेकरू या नात्यानें शहरवासी कामगारांपुढें ज्या अडचणी होत्या त्या सोडविण्यासाठीं ते १९ व्या शतकाच्या आरंभीं निरनिराळ्या सहकारी संघटना स्थापन करूं लागले. भाडेकरूंच्या अडचणी निवारण करण्यासाठीं जे सहकारी प्रयत्न केले गेले, त्यांतूनच घरबांधणीच्या व कर्ज देणाऱ्या सहकारी संघटना उदयास आल्या आणि सध्यां प्रत्येक राज्यांतील सुमारें ६० लक्ष लोक त्या संघटनांचा फायदा घेत आहेत.

---

### भारतांत आलेले विदेशी तज्ज्ञ

१९५३-५४ मध्यें 'फॉरिन एड स्कीम' सालीं ३४ विदेशी तज्ज्ञ भारतांत आले. त्यांपैकीं ११ इंग्रज, १० अमेरिकन, ५ स्विस, ३ स्वीडिश, १ कॅनेडिअन, १ फिनिश, १ ऑस्ट्रेलिअन, १ जपानी व १ फ्रेंच होते.


**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.



**पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरजि पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

**मो. वि. रवडे,**
**मॅनेजिंग डायरेक्टर.**

**नवा सिमेंटचा कारखाना**—असोसिएटेड सिमेंट कंपनी हैद्राबाद राज्यांतील आदिलाबाद जिल्ह्यांत सिमेंटचा नवा कारखाना काढणार आहे. कारखान्यासाठीं १·५ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. हैद्राबाद सरकारची परवानगीहि मिळाली आहे. कारखान्यांत १९५७ पासून उत्पादनास प्रारंभ होईल. दरसाल सुमारें १,००,००० टन सिमेंट सुरवातीला तयार होऊं लागेल.

**पाकिस्तानांत कागदाचा कारखाना**—पूर्व पाकिस्तानांतील चंद्रघोष ह्या ठिकाणीं कागद तयार करण्यासाठीं लागणारा लगदा प्रयोगादाखल करण्यांत येऊं लागला आहे. हा लगदा स्थानिक बांबूंपासून तयार करण्यांत आला असून कागदाच्या गिरणीची गरज भागवूं लागला आहे. कागदाच्या गिरणींत सध्यां दररोज ५० टन कागद तयार होऊं लागला आहे.

**उत्तर प्रदेशांत कागदाचा कारखाना**—उत्तर प्रदेशांत कागदाचा कारखाना काढणें कितपत शक्य आहे, ह्याचा अंदाज घेण्यासाठीं राज्य सरकारनें तज्ज्ञांची एक कमिटी नेमण्याचें ठरविलें आहे. राज्यांतील तेहरी–गढवाल ह्या भागांत आणि डेहराडूनच्या आसपास कागद तयार करण्यासाठीं योग्य असणारीं झाडें असून त्यांच्यापासून दरवर्षी २०,००० टन कच्चा माल मिळूं शकेल असा अंदाज आहे.

**टॉलस्टॉय ह्यांच्या ग्रंथावर चित्रपट**—सुप्रसिद्ध रशिअन लेखक लिओ टॉलस्टॉय ह्यांच्या 'युद्ध आणि शांतता' ह्या ग्रंथाचा आधार घेऊन एक बोलपट काढण्याचा बेत डेव्हिड–ओ सेल्झनिक करीत आहेत. 'गॉन वुइथ दि विंड' ह्या चित्रपटापेक्षाहि अधिक भव्य प्रमाणावर तो काढण्यांत येणार आहे. चित्रपटांतील कलाकार अजून ठरविण्यांत आलेले नाहींत. चित्रीकरणाचें काम एका वर्षांत पुरें करण्यांत येणार आहे.

**मोटारकारखान्यांचें एकत्रीकरण**—भागीदारांनीं मान्यता दिल्यास स्टुडबेकर कॉर्पोरेशन आणि पॅकार्ड मोटार–कार कंपनी ह्या दोन मोठ्या मोटारींच्या कारखान्यांचें एकत्रीकरण करण्यांत येणार असल्याचें समजतें. नवीन कंपनीचें नांव स्टुडबेकर–पॅकार्ड कॉर्पोरेशन ठेवण्यांत येणार असून मि. पॉल हॉफमन हे स्टुडबेकर कंपनीचे अध्यक्ष नवीन कंपनीचे अध्यक्ष राहतील.

**ब्रिटिश बोट घेण्याची मनीषा**—ब्रिटनमधील रशिआचे व्यापारी प्रतिनिधी 'स्टॅनहोप' ही मोटार–बोट विकत घेण्याच्या वाटाघाटी करीत आहेत. बोट मालवहातुक करणारी असून तिचें वजन १०,००० टन आहे. सदर बोट १९५१ सालीं बांधण्यांत आली आहे. बोटीची विक्री करण्यापूर्वी ब्रिटिश परराष्ट्र खात्याची परवानगी घ्यावी लागेल.


कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

—मराठी दुसरी आवृत्ति—

८ जुलै रोजीं प्रसिद्ध होईल.


पृ. सं. १६८ ★ किंमत २॥ रु.

किर्लोस्कर

कॉटेज शेंगायंत्र

शेंगदाणे न फुटतां शेंग फोडली जाते. बी–बियाणासाठीं उपयुक्त. दरेक तासास ८० पौंड शेंग फोडली जाते.

—अधिक माहिती मागवा—



किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

## THE CO-OPERATIVE TRAINING COLLEGE, POONA

**Results of the Examination for the Higher Diploma in Co-operation held in April 1954**

The following students are declared to have passed the examination held in April 1954. The names are arranged in the order of the class and number of marks obtained.

### FIRST CLASS

Iyer P. V. Venkatsubramonia, Dutta D. B., Rai B. B., Nair M. R. Sreedharan, Nanjappan K. S., Bawaskar S. N., Gajandragadkar M. S., Sannabhadti M. S., Marar K. Madhav, Kotadawala J. B., Erram S. S., Katekar E. H., Joshi M. B., Sharma K. L., Bhide S. H., Nivargi C. B., Pereira H. F., Sadanandan K. C., Soman K. V., Pillai C. S. Shankarnarayan.

### SECOND CLASS

Limaye N. P., Mehta G. M., Parikh S. J., Poonawala H. S., Shipurkar G. S., Leique Ahmed., Dev Varma N. R., Desai G. K., Gujar C. L., Phatak S. B., Kulkarni S. V., Dutta B. B., Soman P. D., Gobil M. N., Holla A. M., Desai A. V., Zacariah J. P., Khandekar B. G., Rahman M., Murdeshwar G. S., Puranik S. V., Pillai K. Bhaskaran., Raval R. C.,

### PASS CLASS

Poredi D. S., Ladhe V. S., Pandit Har Prasad., Mahabir Singh R. K., Dharmadhikari J. Y., Bhatt R. R., Mohalay R. S, Bhatt J. M., ( with exemption in Agricultural Economics and Elements of Agriculture ). Shrotriya R. M., (with exemption in Co-operative and Other Laws, Book-keeping and Accountancy, Banking and Marketing )., Kulkarni K. M., ( with exemption in Banking and Advanced Accountancy and Auditing ).

### PRIZES

Prizes have been awarded as under :—

(1) Bombay State Co-operative Bank Ltd., Prize of Rs. 100/- awarded to Iyer P. V. Venkatsubramonia.

(2) Provincial Industrial Co-operative Association Ltd., Bombay Prize of Rs. 50/- awarded to Rai B, B.

K. R. Kulkarni,
Principal & Secretary,

5, B. J. Road, 29th June 1954. } Co-operative Training College Committee, Poona.

### श्री. आर. जी. सरय्या

बॉंबे रोड स्टेट ट्रॅन्स्पोर्ट कॉर्पोरेशनच्या अध्यक्षपदीं श्री. आर. जी. सरय्या ह्यांची नेमणूक मुंबई सरकारनें केली आहे. श्री. सरय्या हे मुंबईचे एक मोठे उद्योगपति व व्यापारी असून निष्ठावंत सहकारी नेतेहि आहेत. मुंबई राज्य सहकारी बँकेचे ते चेअरमन आहेत.

### पाकिस्तानांत अमेरिकन लष्करी साहित्य व तज्ज्ञ

पाकिस्तान–अमेरिकन संरक्षक करारास अनुसरून, ऑक्टोबरमध्यें अमेरिकन दारू-गोळ्याचा पहिला हप्ता कराचीस येऊन पोंहोचेल, असें पाकिस्तानांतील अमेरिकन वकिलानें कराची येथें जाहीर केलें. अमेरिकन लष्करी साहित्याचा पुरवठा बरींच वर्षे चालूं राहील. ३० अमेरिकन लष्करी तज्ज्ञ येत्या महिन्यांत पाकिस्तानांत दाखल होतील.

### चितळेनगर येथें साखर कारखाना निघणार

( लि. आ. म. )

मुंबई राज्यांत सोलापूर जिल्ह्यांत चितळेनगर येथें एक नवा साखर कारखाना लवकरच सुरू होणार असून त्यासाठी रु. १५ लाख शेअरभांडवलाची चितळे शुगर वर्क्स लिमिटेड या नांवाची पब्लिक लिमिटेड कंपनी चितळे बंधूंनीं स्थापन केली आहे.

चितळे ॲग्रिकल्चरल् प्रॉडक्टस् लिमिटेड या कंपनीच्या सहकार्यानें हा साखरकारखाना काढण्यासाठी श्री. वा. द. चितळे यांनीं भारत सरकारकडे कांहीं महिन्यांपूर्वी केलेला अर्ज भारत सरकारनें मंजूर करून साखर कारखाना काढण्यासाठी लागणारा आवश्यक परवाना ( लायसेन्स ) दिला आहे. त्याचप्रमाणें वरील पब्लिक लिमिटेड कंपनीच्या शेअरभांडवलासाठी लागणारी परवानगी भारत सरकारचे कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज यांचेकडून मिळाली आहे.

या कारखान्यांत दररोज ६०० टन ऊंस गाळला जाऊं शकेल व सबंध सीझनमध्यें ८०,००० टन ऊंस गाळला जाऊन त्याची सुमारें ८०,००० पोतीं साखर दर साल या कारखान्यांतून निघूं शकेल, व त्याची हल्लींच्या बाजारभावानें किंमत सुमारें रु. ६० लक्ष होईल.

ह्या कारखान्याचें खास वैशिष्ट्य म्हणजे चितळेनगरच्या आजूबाजूचे उसाचे बागाईतदार या कंपनीचे भागीदार होऊन या कंपनीला लागणाऱ्या उसाचा पुरवठा योग्य मोबदल्यांत करतील. अशा रीतीनें आजूबाजूच्या उसाच्या बागाईतदारांच्या आर्थिक हितसंबंधांसहि योग्य संरक्षण मिळेल. चितळे बंधूंना ह्या धंद्याचें सर्व तांत्रिक व धंदेविषयक ज्ञान व अनुभव असल्यामुळें ते चितळे ॲग्रिकल्चरल् प्रॉडक्टस लिमिटेड या कंपनीच्या संपूर्ण सहकार्यानें हा साखर कारखाना निश्चित यशस्वी करतील यांत शंका नाहीं.

मुंबई राज्य हें साखरेच्या उत्पादनाच्या दृष्टीनें तुटीचें राज्य असल्यामुळें साखरेचे ग्राहक व भांडवल गुंतविणारा वर्ग या दोघांकडूनहि या नवीन साखरकारखान्याचें निश्चित स्वागत होतील.

### पांच कोटी टेलिफोन्स

अमेरिकेच्या टेलिफोन व टेलिग्राफ कंपनीनें पांच कोटी संख्यांकाचा टेलिफोन व्हाइट हाऊस येथील आयसेनहोवर यांच्या कचेरींत त्यांना तो टेलिफोन सादर करून नुकतांच बसविला. आज अमेरिकेंत पांच कोटी टेलिफोन्स चालू आहेत. अलेक्झँडर बेल यांनीं पहिला टेलिफोन १८७८ मध्यें सुरू केला.

### अणुशक्तीनें वीज निर्मितीस प्रारंभ

५,००० कि. वॅ. शक्ति निर्माण करणारें अणुशक्तीचें केंद्र रशियांत चालू झालें आहे. २७ जून, १९५४ रोजीं ह्या केंद्रानें वीज निर्माण करण्यास प्रारंभ केला. आतां ५०,००० ते १,००,००० कि. वॅ. शक्ति निर्माण करणारीं केंद्रें स्थापण्याचे कामीं रशियन शास्त्रज्ञ गुंतले आहेत. कंबरलंड ( ग्रेट ब्रिटन ) मध्यें ब्रिटिश उभारीत असलेलें केंद्र जगांतील पहिलेंच केंद्र होईल, अशी कल्पना होती, परंतु रशियानें आघाडी मारली आहे.

### सारस्वत को. बँक लि.

वरील बँकेस ३० जून अखेर संपलेल्या वर्षी ८३,२६५ रु. निव्वळ नफा झाला. ६½% दरानें डिव्हिडंड वांटण्यास ४५,५०० रु. लागतील. शेअर–भांडवल वाढलें असलें, तरी डिव्हिडंडचा दर कायम आहे.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीप्रद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.